PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Gulacha Ganpati
Year: 1953

Song: Hi Kuni Chhedili Taar
Lyricist: Ga. Di. Madgulkar

ही कुणी छेडीली तार
ही कुणी
ही कुणी छेडीली तार
ही कुणी छेडीली तार
प्राजक्ताच्या मधू गंधासम
कुठूनी ये केदार
ही कुणी छेडीली तार

तूच छेडती तूच ऐकती
आर्त सुरावट तुझ्याच हाती
आर्त सुरावट तुझ्याच हाती
स्पर्शावाचून तूच छेडीसी
माझी हृदय सतार
ही कुणी छेडीली
प्राजक्ताच्या मधू गंधासम
कुठूनी ये केदार
ही कुणी छेडीली तार

जागृत मी का आहे स्वप्नी
श्रवणी पडे पण दिसे न नयनी
श्रवणी पडे पण दिसे न नयनी
स्वप्नातच का मजसी
बोलले माझे राजकुमार
ही कुणी छेडीली तार

स्वप्नासम मज झाले जीवन
स्वप्नही नीरस सखे तुझ्याविण
स्वप्नही नीरस सखे तुझ्याविण
अर्ध्या रात्री शोधीत आलो
तुझे प्रियतमे दार
ही कुणी छेडीली तार

वेलीवर त्या नका चढू नका
वेलीवर त्या नका चढू नका
चढा सूर नच लवे गायका
तूच चढविला तार स्वर हा
तूच तोड ही तार
ही कुणी छेडीली तार
ही कुणी छेडीली तार

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*